Friday, November 07, 2014
4:32 PM

# आ. प्रशांत ठाकूर यांनी केली
# पनवेल न.पा.च्या स्वच्छता अभियानची पाहणी

पनवेल–पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या देशव्यापी स्वच्छता मोहीमेला संपुर्ण देशात चांगला प्रतिसाद लाभत आहे. या अभियानाचा भाग म्हणून पनवेल न.पा.ने शहरात राबविलेल्या स्वच्छता अभियानाची शुक्रवार दि. ७ रोजी आ. प्रशांत ठाकूर यांनी पाहणी केली.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारतासाठी सुरु केलेल्या स्वच्छता मोहीमेमुळे देशात स्वच्छतेचे वारे वहात आहेत. पनवेल शहरातही पनवेल न.पा. ने स्वच्छता अभियान राबविले आहे. या अभियानांतर्गत आ. प्रशांत ठाकूर यांनी शहरातील अशोका गार्डन, तालुका पोलिस स्टेशन, प्रभु आळी,आदी ठिकाणी साफसफाईची पाहणी केली.त्यावेळी आ. प्रशांत ठाकूर यांनी स्थानिक भागातील नागरीकांच्या भेटी घेवून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व जागचे जागी त्या सोडविण्यासाठी प्रशासनाला निर्देश दिले. यावेळी त्यांचे सोबत पनवेल न.पा. आरोग्य सभापती अनिल भगत, पनवेल न.पा.आरोग्य अधिकारी व कर्मचारी होते.